# ॥ आचार्य देवो भव ॥

-प्रल्हाद जाधव

या एकांकिकेतील पात्रे :

गुरूजी

आणि

विद्यार्थी

या एकांकिकेचा कोणत्याही माध्यमातील, कोणत्याही भाषेतील प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

(गुरूजींचे घर. रात्रीची वेळ. विद्यार्थी येतो.)

विद्यार्थी : गुरूजी, मी आत येऊ? (गुरूजी पाहतात)

विद्यार्थी : मी आत येऊ गुरूजी ?

गुरूजी : ये, ये! घरात यायला परवानगी कसली विचारतोस? ही काही शाळा नाही. ये.

विद्यार्थी : खरं तर अशा रात्रीच्या वेळी मी तुम्हाला त्रास द्यायला नको होता. विशेषत: आज.

गुरूजी : का?

विद्यार्थी : आज तुम्ही निवृत्त झालात गुरूजी. तुमचं संपूर्ण आयुष्य तर कामात गेलं पण आजचा शेवटचा दिवससुद्धा तुम्ही अगदी सकाळपासून कामात मग्न आहात. त्यामुळं...

गुरूजी : काही हरकत नाही. बोल...

विद्यार्थी : गुरुजी, तुमच्या निवृत्तीचा सोहळा आगदी दृष्ट लागण्यासारखा झाला. विशेष म्हणजे एका शिक्षकाच्या निवृत्तीसाठी शिक्षण मंत्री आल्याचं आजवर मी कधी बघितलं नव्हतं. तुमचं भाषण म्हणजे तर आजच्या समारंभाच्या कळसाचा अध्याय होता.

गुरूजी : तू म्हणतोस ते खरं असेल मुला, पण आयुष्यात मी कधी स्तुतीला भाळलो नाही.

विद्यार्थी : तुमची स्तुती करण्याचा माझा हेतू नाही गुरूजी. फक्त मनात ज्या भावना उचंबळून आल्या त्या व्यक्त केल्या.

गुरूजी : खरं तर मला सत्काराची हौस नव्हती. स्वत:चा सत्कार करून घ्यावा असं मला आयुष्यात कधीही वाटलं नाही. आदर्श शिक्षक म्हणून आपला सन्मान व्हावा यासाठी धडपडणारे अनेक शिक्षक असतात. पण त्या क्षुद्र स्पर्धेमध्ये मी कधीही पडलो नाही. खुद्द मुख्यमंत्र्यांनी पत्र पाठवून विनंती केली म्हणून मी राष्ट्रपतीपदक स्वीकारलं... तिथंही स्वत:च्या कर्तृत्वापेक्षा मुख्यमंत्र्यांचा शब्द वाया जाता कामा नये हाच उद्देश होता. सत्काराच्या शाली आणि गौरवाचे दाखले मिळावायचे असते तर आजवर त्यांचा ढीग झाला असता.

न त्वहं कामये राज्यम् न स्वर्गम् न पुनर्भवम्<br>
कामये दु:खतप्तानाम् प्राणिनामातिनाशिनम्

विद्यार्थी : तुमच्यावर लोकांचं किती प्रेम आहे हे आजच्या समारंभामुळं दिसून आलं. लांबलांबचे विद्यार्थी आले होते. मंडपात पाय टाकायला जागा नव्हती. शिक्षणमंत्र्यांनी तुमच्या अंगावर शाल घातली तेव्हा झालेला टाळ्यांचा कडकडाट अजून कानात घुमतोय. असा धन्यतेचा क्षण फार थोड्या माणसांच्या आयुष्यात येतो गुरुजी. अत्यंत यशस्वी जीवन

जगलात तुम्ही.

गुरुजी : यशाच्या मागे लागणारा माणूस नव्हतो मी आणि म्हणूनच कदाचित यश माझ्या मागे हात जोडून धावत राहिलं असेल...

विद्यार्थी : आयुष्याचं रहस्य एका साध्या सरळ वाक्यात सांगितलंत तुम्ही.

गुरूजी : पण आयुष्य इतकं साधं आणि सरळ नसतं मुला... आज तुला इथं शाळेची भव्य वास्तू दिसतेय. नंदनवनासारखा फुललेला परिसर दिसतोय, पण तो काही एका रात्रीत झालेला चमत्कार नाही...रात्र बघितली नाही की दिवस, ऊन बघितलं नाही की पाऊस. जीवघेणी पायपीट केली. मुलं मिळवली, देणग्या मिळवल्या, कष्ट केले, घाम गाळला, प्रसंगी उपाशी राहिलो, संसारातली नाराजी पत्करली, लोकांच्या संशयाचे जहरी फुत्कार सहन केले, खूप घाव सोसले...

विद्यार्थी : म्हणूनच तुम्हाला आज देवपण प्राप्त झालं.

गुरूजी : मी स्वत:ला देव मानत नाही.

विद्यार्थी : पण लोक मानतात.

गुरूजी : मी काही विशेष करू शकलो असं लोकांना वाटत असेल तर तो गौरव मी ज्या क्षेत्रात काम करतो त्याचा आहे. विद्या ही विवादासाठी नसून ज्ञानासाठी असते, दिल्यानं ती सतत वाढत राहते, एवढं एक साधं सत्य मी प्रामाणिकपणे आचरणात आणलं...पण लोकांना वाटतं मी काहीतरी अलौकिक केलंय. चालायचंच. अनेकदा फुलांच्या संगतीमुळं क्षुद्र दोराही परमेश्वराच्या गळ्यात जाऊन पडतो.

विद्यार्थी : गुरूजी, जिथं नतमस्तक व्हावं असे शिक्षक आता फार थोडे राहिलेत. (त्यांच्या पायावर डोकं ठेवतो.)

गुरूजी : अरे...अरे...हे भलतंच काय करतोस? उठ...कोण तू? मी ओळखलं नाही तुला.

विद्यार्थी : खरंच ओळखलं नाही?

गुरूजी : खरं बोलण्यात आयुष्य गेलं माझं. उत्तर पत्रिकेतलं खोट उत्तरसुद्धा कधी खपवून घेतलं नाही मी.

विद्यार्थी : मला माफ करा गुरूजी. तुम्ही खोटं बोलत असाल असं मला म्हणायचं नव्हतं... खरंतर तुम्ही ओळख ठेवावी असं एखादं गौरवास्पद वगैरे कार्य माझ्याकडून झालेलं नाही. पण मी तुमचा एक विद्यार्थी, एवढी ओळख पुरेशी नाही का होणार?

गुरूजी : विद्यार्थी, ते लक्षात आलं रे. पण माझे असंख्य विद्यार्थी आहेत. कितीजणांची ओळख ठेवणार? त्यात रोज कोणी ना कोणी भेटायला येतं. परवा तो हा आला होता – गायधनी. खूप मोठा वकील झालाय आता. जाताना मला एक गजराचं घड्याळ भेट देऊन गेला...तुला कल्पना आहे

की मी कधी घड्याळावर विसंबून राहिलो नाही. माझ्याकडे घड्याळ नसतानासुद्धा गेल्या पंचवीस वर्षांत शाळेतली घंटा वेळच्यावेळी वाजत राहिली. पण त्यानं ऐकले नाहीच. म्हणाला, आता एकटे आहात तर ठेवा.

विद्यार्थी : घड्याळाच्या गजराची सोबतही कधी कधी हवीशी वाटते.

गुरूजी : नेमकं हेच म्हणाला तो. तसंच काही दिवसांपूर्वी करंदीकर आला होता. अमेरिकेत इंजिनियर आहे. खोऱ्यानं पैसा ओढतोय. जाताना मला एक आश्चर्यकारक वस्तू...

विद्यार्थी : भेट म्हणून देऊन गेला.

गुरूजी : (चमकून) तुला कसं माहीत?

विद्यार्थी : कारण मी तुमच्यासाठी कोणतीही भेट आणू शकलेलो नाही.

गुरूजी : माझ्या बोलण्यातून भलताच अर्थ काढू नकोस मुला. मी कुणालाही कधी माझ्यासाठी भेटी आणयला सांगितलेलं नाही. फुकटच्या भेटी स्वीकारणं माझ्या जीवनमूल्यात बसत नाही. पण काही वेळा विद्यार्थ्यांच्या भावनांचाही विचार करावा लागतो...नाहीतर तुला मी इतक्या रात्री भेटलोच नसतो.

विद्यार्थी : माफ करा गुरूजी... चुकलो मी.

गुरूजी : ठीक. कोण तू?

विद्यार्थी : मी गोखलेबाईंचा मुलगा.

गुरूजी : आँ?

विद्यार्थी : गोखलेबाईंचा मुलगा.

गुरूजी : गोखलेबाईचा मुलगा? काय म्हणतोस काय? किती वर्षांनी दिसतोयस, आणि किती बदललासरे तू? तुला सांगतो गोखलेबाईंसारखी विद्यार्थीप्रिय शिक्षिका मी दुसरी पाहिली नाही. कविता शिकवण्यात तर त्यांचा कोणी हात धरत नसे. त्यांचा गळा इतका गोड होता की, चालीवर कविता म्हणायला लागल्यावर सर्वजण मंत्रमुग्ध होऊन जायचे. त्यांचा मुलगा तू? केवढा मोठा झालास रे बाळा...

विद्यार्थी : विश्वास नाही ना बसत?

गुरूजी : खरंच नाही बसत विश्वास. अर्धी चड्डी घालून मनगटानं शेंबूड पुसत फिरायचास. भेदरलेल्या सशासारखा वर्गातल्या कोपऱ्यात बसायचास. कुणी काही बोलं की रडत सुटायचास. केवढा फरक झालाय रे तुझ्यात. ये बैस. चहा घेणार थोडा?

विद्यार्थी : मी चहा घेत नाही गुरूजी.

गुरूजी : माझ्याकडे मी कॉफी ठेवत नाही. पण लिंबू सरबत मिळेल. करू थोडं?

विद्यार्थी : खरंच काही नको गुरूजी.

गुरूजी : नको कसं, इतक्या वर्षांनी भेट झाली. तू काहीतरी घेतल्याशिवाय मला

बरं वाटणार नाही.

(विद्यार्थी खिशातून बाटली काढतो आणि बूच उघडून घटाघटा पितो.)

गुरूजी : तू...तू... हे काय प्यायलंस आता?

विद्यार्थी : दारू... दारू पितो मी गुरूजी.

गुरूजी : अगदी तीसपर्यंत पाढे पाठ येतात अशा कौतुकानं सांगतोहेस.

विद्यार्थी : पाढे पाठ करण्यापेक्षा दारू पिणं फार कठीण असतं गुरूजी.

गुरूजी : काय म्हणालास?

विद्यार्थी : खरं तेच सांगतोय. तुम्हाला येते पिता?

गुरूजी : दारू फार वाईट असते बाळा. त्यामुळे शरीराची हानी तर होतेच पण आत्म्याचाही विनाश होतो. (विद्यार्थी हसतो.)

गुरूजी : का हसलास?

विद्यार्थी : माफ करा पण तुम्ही घेतलेय कधी?

गुरूजी : भलतंच...

विद्यार्थी : न पिताच तिच्या दुष्परिणामांविषयी बोलायचं म्हणजे पाठाची तयारी न करताच वर्गावर जाण्यासारखं नाही वाटत तुम्हाला? घेताय थोडी?

गुरूजी : तुझं इतकं अध:पतन होईल असं वाटलं नव्हतं मला...

विद्यार्थी : अनुभव हा सर्वश्रेष्ठ गुरू आहे असं नेहमी म्हणायचेत तुम्ही. थोडा अनुभव घेऊन बघा. (बाटली पुढं करतो.)

गुरूजी : शी: शी: शी: शी:, मी तुझ्यासाठी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो, दयेची भीक मागतो. परमेश्वरा, या अजाण लेकराला क्षमा कर...

विद्यार्थी : परमेश्वर जर असलाच तर त्याच्याजवळ स्वत:साठी क्षमायाचना करा गुरूजी.

गुरूजी : म्हणजे? काय म्हणायचं काय तुला?

विद्यार्थी : तुम्हाला ते चांगलं समजतंय.

गुरूजी : मद्यपानामुळं तुझी सद्सद्विवेकबुद्धी भ्रष्ट झालीय मुला. निघून जा येथून.

विद्यार्थी : पण मला तुमच्याशी काही बोलायचंय.

गुरूजी : शुद्धीवर आल्यावर ये, पण आता इथं क्षणभरही थांबू नकोस.

विद्यार्थी : येताना घेतली तशी जातानाही परवानगी घेईन मी तुमची !

गुरूजी : चालता हो ताबडतोब...

विद्यार्थी : ही शाळा नाही गुरूजी.

गुरूजी : हे माझं घर आहे आणि म्हणूनच मी तुला धक्के मारून बाहेर काढू शकत नाही याचं दु:ख होतंय मला. अजूनही मी तुला अगदी सभ्यपणे सांगतो की, तू निघून जा येथून...

विद्यार्थी : आणि समजा मी जर नाही गेलो तर काय करणार तुम्ही माझं? नापास कराल मला? (हसतो) नापास तर काय पण तुम्ही आता माझं आणखी

काहीही नुकसान करू शकणार नाही.

गुरूजी : आणखी काहीही नुकसान? काय म्हणायचंय काय तुला? आणि नेमकं काय हवंय तुला?

विद्यार्थी : मला माझ्या काही शंकांचं निरसन करून घ्यायचंय गुरूजी...

गुरूजी : तुझ्यासारख्या अध:पतीत मुलाच्या शंकांचं निरसन करायला मी तुझा बांधलेला नाही.

विद्यार्थी : तुम्ही माझे गुरुजी आहात...

गुरूजी : होतो.

विद्यार्थी : एकूण एकच.

गुरूजी : तुझं व्याकरणसुद्धा कच्चं आहे मुला. आहात आणि होतो यात जमीन अस्मानचं अंतर आहे.

विद्यार्थी : असेल. पण व्याकरण आणि व्यवहार यात एका इंचाचंही अंतर नसतं गुरूजी. व्यवहारात एकदा झालेला गुरू हा कायमचा गुरू असतो...

गुरूजी : तू फक्त सातवीपर्यंतच होतास माझ्याकडे.

विद्यार्थी : पहिले ते सातवी. एकूण सात वर्ष. म्हणजे माझ्या आयुष्यातील सर्वात कोवळं, संस्कारक्षम आणि ज्ञानग्रहणशील वय तुमच्याकडं गेलं. या वयात मूल मातीच्या गोळ्यासारखं असतं. तुम्ही द्याल तसा आकार ते धारण करतं. तुम्ही कराल ते संस्कार त्याच्यावर जन्मभर टिकतात. त्याच्या भविष्याला कोणती दिशा मिळणार हे याच वयात ठरत असतं, या अर्थानं त्याच्या भविष्याची जबाबदारी ही शिक्षकावरच असते. आणि म्हणूनच शिक्षकाला भावी पिढीचा शिल्पकार म्हटलं जातं.

गुरूजी : प्रस्तावनेची गरज नाही. तू सरळ मुद्द्यावर येऊ शकतोस.

विद्यार्थी : धन्यवाद गुरूजी! पण आपल्या कृपेमुळे मी जेव्हा प्रत्यक्षपणे या जगाच्या बाजारात उतरलो तेव्हा अतिशय कुचकामी आणि नालायक ठरलो. तुम्ही दिलेल्या शिक्षणाचा मला कवडीभरही फायदा झाला नाही.

गुरूजी : असं जर असेल तर माझ्या हातून शिकलेली सर्वच मुलं जगाच्या बाजारात नालायक आणि कुचकामी ठरली असती. पण त्यांच्यापैकी अनेक विद्यार्थी आज त्यांच्या जीवनात यशस्वी झालेले दिसतात.

विद्यार्थी : ते यशस्वी जरूर झाले असतील पण तिथं तुम्ही दिलेलं शिक्षण त्यांना उपयोगी पडलेलं नाही. तर प्रत्येकजण आपापल्या चतुराईवर मोठा झाला, हे मी खात्रीनं सांगू शकतो गुरूजी.

गुरूजी : मग तुलासुद्धा इतरांप्रमाणेच स्वत:च्या चतुराईवर मोठं होता आलं असतं.

विद्यार्थी : एकदम शंभर टक्के मान्य. पण मग प्रश्न उरतो तो हा की आम्ही तुमच्या शाळेत कशासाठी यायचं?

गुरूजी : मुला, शाळा म्हणजे एखादी मील नाही की, जिच्यातून कापूस आत येतो

आणि कपडा बाहेर पडतो. शाळेमध्ये शिक्षक आणि विद्यार्थी या दोन जिवंत घटकांचा संबंध असतो आणि हा संबंध परस्परांवर अवलंबून असतो. तुला वाटतं त्याप्रमाणे विद्यार्थी म्हणजे काही एखादं 'प्रॉडक्ट' नाही की, ज्याचवर गॅरंटीचा शिक्का मारून ते बाजारात आणता येईल.

विद्यार्थी : पण एखादं प्रॉडक्ट हे बाजारात विकलं जाईल या अपेक्षेने व्यापारी त्याच्यावर गुंतवणूक करीत असतो.

गुरूजी : मग?

विद्यार्थी : त्याचप्रमाणे पालक आपल्या पाल्यावर आर्थिक गुंतवणूक करीत असतो असं वाटत नाही तुम्हाला?

गुरूजी : मुला, मी तुझ्या प्रश्नाचं उत्तर होकारार्थ द्यावं आणि तू माझ्याकडे नुकसानभरपाई मागावीस असा सरळ डाव आहे तुझा. तुझी कल्पना अतिशय छान आहे पण तुझा मूर्खपणासुद्धा अतिशय लक्षणीय आहे. मूर्ख मुला...कुणावर कधी जर हल्ला करायचा झाला तर एक गोष्ट नेहमी लक्षात ठेव. हल्ला इतका व्यवस्थित रायचा की, प्रतिपक्षाला बचावाची संधीच मिळू द्यायची नाही.

विद्यार्थी : तुमची ही शिकवण यापुढे लक्षात ठेवीन मी पण त्यामुळे यापूर्वी झालेलं माझं नुकसान भरून निघत नाही, त्याचं काय ?

गुरूजी : सातवीत तू शाळा सोडून गेलास, तिथं तुझा आणि माझा संबंध संपला...

विद्यार्थी : पण सातवीनंतर माझा आणि शिक्षणाचा संबंधही संपला...

गुरूजी : म्हणजे? गोखलेबाईंनी पुढं शिकवलं नाही तुला? (विद्यार्थी हसतो.)

गुरूजी : का हसलास? अरे, त्या स्वत: उत्तम शिक्षिका होत्या. कविता शिकवण्यात तर त्यांचा कोणी हात धरत नव्हतं. कुठं असतात हल्ली त्या?

विद्यार्थी : एक दिवस आई शाळा सोडून चालती झाली.

गुरूजी : ते आठवतंय मला. पण हल्ली कुठं असतात त्या? पुढं काय झालं त्यांचं?

विद्यार्थी : तुमच्या अंदाजाप्रमाणे काय झालं असेल?

गुरूजी : काय अंदाज करणार? साध्वी बाई होती बिचारी. पण तिच्या लोभस व्यक्तीमत्वाच्या डेरेदार वृक्षावर दुर्देवाचं एक बांडगुळही सतत वाढत होतं. तू जन्माला यायच्या आधीच तुझे वडील वारले. पांढऱ्या पायाची म्हणून सासरच्यांनी बाहेर काढलं. प्रेमविवाह केला म्हणून माहेर आधीच तुटलेलं. एके दिवशी घायाळ पक्षीणीसारखी माझ्याकडं आली आणि मी तिला शिक्षिका म्हणून लावून घेतली. काही काळ आमच्या शाळेत होती. आम्ही सांभाळून घेत होतो तिला. पण एके दिवशी अचानक जशी आली तशी निघून गेली...तिचं पुढं काय झालं ते आजवर कुणालाही कळलं नाही.

विद्यार्थी : तिचं पुढं काय झालं असेल याचा शोध घ्यावा असं कधी तुम्हाला वाटलं नाही गुरूजी?

गुरूजी : जरूर वाटलं. पण शाळेच्या प्रचंड व्यापातून डोकं वर काढायलासुद्धा फुरसत मिळत नव्हती.

विद्यार्थी : आई शाळेतून एकाएकी कशी नाहीशी झाली. तुम्हाला खरंच माहीत नाही गुरूजी?

गुरूजी : माझ्या मुला, दुसऱ्यांच्या परीक्षा घेण्यात माझं आयुष्य गेलं. तू कशाला माझी परीक्षा घेण्याचा वेडेपणा करतोहेस? मला खरंच माहीत नाही तुझ्या आईचं पुढं काय झालं ते...

विद्यार्थी : ऐकायचंय?

गुरूजी : तेवढंच तुझं मन हलकं होईल, सांग.

विद्यार्थी : ऐकू शकाल तुम्ही?

गुरूजी : आयुष्यात इतक्या अनपेक्षित धक्क्यांना सामोरा गेलोय की, आता अगदी सुखदु:खाच्या पलिकडे गेलोय मी. बोल...

विद्यार्थी : वार्षिक परीक्षा संपून मे महिन्याची सुट्टी लागली होती. तुमच्या घरातले सर्वजण सुट्टीनिमित्त बाहेर गेलेले होते. घरात तुम्ही फक्त एकटे हातात, आणि तुम्ही आईला इथं बोलवलंत.

गुरूजी : (हसतात) तुझ्या आईला मी इथं बोलावलं? अरे, मी तुला कल्पनाविस्तार करायला सांगितलेला नाही. फक्त वस्तुस्थिती विचारलेय.

विद्यार्थी : मी वस्तुस्थितीच सांगतोय गुरूजी. ज्या दिवशी आई शाळा सोडून गेली, त्याच्या आदल्यादिवशी ती तुमच्याकडं, इथे आली होती.

गुरूजी : ही धादान्त खोटी माहिती कुणी दिली तुला ?

विद्यार्थी : आई तेव्हा दैनंदिनी लिहित असे, एक दिवस तिची दैनंदिनी माझ्या हातात पडली आणि मला हे सर्व समजलं.

गुरूजी : असं जर असेल तर मग तिनं आपल्या दैनंदिनीत अरेबियन नाईट्समधल्या सुरस आणि चमत्कारिक कथा लिहून ठेवल्या असतील.

विद्यार्थी : खरी सुरस आणि चमत्कारिक कथा पुढंच घडली.

गुरूजी : काय घडलं नंतर?

विद्यार्थी : ऐकायचंय?

गुरूजी : खोटं बोलण्यात तू कुठवर मजल मारतोस हे तरी समजेल मला.

चिद्यार्थी : तुम्ही तिला इथं बोलावलीत आणि ती कविता म्हणायला सांगितलीत.

गुरूजी : कोणती कविता?

विद्यार्थी : क्षणेक्षणी पडे उठे परि बळे उडे बापडी
चुके पथही येऊनी स्तिमित दृष्टीला झापडी
किती घळघळा गळे रूधीर कोमलांगातूनी

तशीच नीजकोटरा परत पातली पक्षिणी ..

रेव्हरंड नारायण वामन टिळक यांची ही कविता
आई चालीवर ही कविता उत्तम म्हणत असे. घरात ही
कविता ती वारंवार म्हणायची आणि ती ऐकत असताना काहीतरी भीषण घडतंय या शंकेचं एक असहाय पाखरू माझ्या काळजात फडफडाट करीत रहायचं...

गुरूजी : त्यात कसलं आलंय शंकेचं पाखरू? टिळकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता, आणि येशू ख्रिस्ताचं दु:ख त्यांना या कवितेतून मांडायचं होतं. प्रत्येकाला शेवटी आपला क्रूस आपणच वाहून न्यायचा असतो, हे सत्यं मांडलंय त्यांनी या कवितेतून.

विद्यार्थी : अगदी बरोबर. ही कविता मुलांना कशी शिकवायची हे तुम्ही आईला सांगणार होता पण त्यावेजी तुमची विकृती उफाळून वर आली आणि तुम्ही तिचा हात धरलात...

गुरूजी : शी: शी:, किती घाणेरडं बोलतोयस रे. परमेश्वरा, या नादान मुलाला क्षमा कर.

विद्यार्थी : तुम्ही आईचा हात धरलात तेव्हा तुमच्या डोळ्यात वासनेचा सैतान जागा झाला होता. तो बघून आई सैरभैर झाली. जीवाच्या आकांतानं तिनं आपला हात सोडवून घेतला आणि ती दरवाजाच्या दिशेनं धावली पण एखाद्या हिंस्त्र श्वापदासारखी तुम्ही तिच्यावर झडप घातलीत.

गुरूजी : तू इतकं प्रभावी वर्णन करतोहेस की, लोक नक्की तुझ्यावर विश्वास ठेवतील, पण गोखलेबाईसारख्या एका अश्राप विधवेविषयी मला असं कधी स्वप्नही पडलं नाही. तुला माहीत नसेल बाळा, पण मी तिला माझ्या मुलीसारखी मानायचो...

विद्यार्थी : कारण मानलेल्या मुलीवर बलात्कार करायला काही विशेष अडचण येत नाही.

गुरूजी : स्वत:च्या मातेविषयी इतकं जहाल गरळ ओकताना तुझी जीभ का झडून पडली नाही, याचं आश्चर्य वाटतंय मला.

विद्यार्थी : सत्य इतक्या आकस्मात आणि उघडपणे सामोरं आलेलं असतनासुद्धा तुमच्या ढोंगीपणाचा बुरखा गळून पडत नाही, याचं आश्चर्य मलाही वाटतंय.

गुरूजी : काय सत्य आणि काय असत्य!

विद्यार्थी : याचा फैसला करण्याची तयारी आहे तुमची?

गुरूजी : आता मात्र माझा नाईलाज आहे मुला. तू म्हणतोस तर होऊनच जाऊदे. माझ्या कारकिर्दीतला आजचा हा अखेरचा दिवस फार विलक्षण

दिसतोय. कारण ज्या दिवशी मंत्रीमहोदयांनी माझा उल्लेख 'निष्कलंक चारित्र्याचा निष्काम कर्मयोगी' म्हणून केला त्याचदिवशी तुझ्यासारखा एक अध:पतीत मुलगा माझ्या अंगावर गलिच्छ आरोपाचं शेण फेकतोय... परमेश्वरा, तू माझी सत्त्वपरीक्षा घेतोहेस असंच मानतो मी. बोल, मी तुझ्या आईवर बलात्कार केला, याला तुझ्याकडे काय पुरावा आहे?

विद्यार्थी : आईनं लिहिलेली दैनंदिनी.

गुरूजी : ही दैनंदिनी हा काही पुरावा होऊ शकत नाही. मनात आणलं तर कोणीही त्याला हवी तशी दैनंदिनी लिहून घेऊ शकेल.

विद्यार्थी : पण आईचं अक्षर तर तुम्ही नक्कीच ओळखता गुरूजी.

गुरूजी : अक्षरासारखं अक्षर काढणंही सोपं असतं मुला.

विद्यार्थी : आणि ही घटना प्रत्यक्ष पाहणारी एखादी व्यक्ती तुमच्यासमोर उभी केली तर?

गुरूजी : पैसे देऊन असे कितीतरी खोटे पुरावे सादर करता येतात.

विद्यार्थी : आणि समजा, याक्षणी मी प्रत्यक्ष माझ्या आईला तुमच्यासमोर उभी केली तर?

गुरूजी : माफ कर मुला, पण तुला वेड लागलेलं आहे याविषयी खात्रीच पटलीय माझी आता.

विद्यार्थी : वेड कुणाला लागलंय ते आता एका क्षणातच सिद्ध होईल. ती पहा आई. आई ये इकडे. सावकाश. ये अशी. ह्या नीच-नराधम माणसाला त्याच्या पापाचा पुरावा प्रत्यक्षच पाहू दे.

गुरूजी : (हसतात) मूर्ख पोरा, तुझी आई इथे येऊच शकत नाही.

विद्यार्थी : मूर्ख तुम्ही आहात गुरूजी. तुम्ही म्हणता माझी आई इथं येऊ शकत नाही आणि मग इथं उभी आहे ती कोण आहे?

गुरूजी : इथे जर कोणी उभं असलंच तर ते तुझ्या आईचं भूत असेल...

विद्यार्थी : भूत? म्हणजे?

गुरूजी : (हसत) एवढी साधी गोष्ट कळू नये तुला मूर्खा... अरे, तुझी आई आता या जगातच नाही. कारण तिच्यावर बलात्कार केल्यानंतर मी तिला माझ्या स्वत:च्या हातानी ठार केलं आणि या इथं अगदी इथंच मी तिला पुरून टाकली...(संगीत. गुरूजी पूर्णपणे उघडे झालेले.)

विद्यार्थी : (बाटली काढून घटाघटा पितो आणि काही क्षणानंतर) आई गेली आणि माझ्या डोक्यावरचं आभाळ फाटलं. कुणी शब्दानं विचारलं नाही की मदतीसाठी हात पुढं केला नाही. आयुष्याच्या गटारावर बेवारशी कुत्र्यासारखा भटकत राहिलो. गेलो तिथं हेटाळणी झाली... उकिरड्यावर फेकून दिलेल्या पत्रावळीचं जीणं नशिबी आलं. वाटलं बस्स झालं,

संपवावं हे सगळं आता... आणि त्याच बेसावध क्षणी मला जगण्यासाठी एक कारण मिळालं...आपली आई एकाएकी का नाहीशी झाली, काय झालं असेल तिचं, याचा शोध घ्यायचा... माझ्या फाटक्या आयुष्याच्या अंतर्यामी असलेल्या या मऊ-उबदार अस्तराचा मला शोध लागला आणि नव्या उमेदीनं जगायला लागलो मी. आयुष्य असं मेलेल्या उंदरासारखं फेकून देण्याऐवजी आईच्या शोधासाठी घालवण्याचा नितांत सुंदर पर्याय मिळाला आणि मी जगायला शिकलो. माणसं जवळून बघायला शिकलो, माणसं समजून घ्यायला शिकलो, व्यवहारातले डावपेच, छक्केपंजे, कावेबाजपणा, स्वार्थ, ढोंग, सारंसारं तळहातावर ठेवल्यासारखं तपासायला शिकलो. माझ्या या सर्व नवीन आणि खऱ्या-खुऱ्या शिक्षणाची परीक्षा मी आज पास झालो गुरूजी. आणि त्यासाठी मला तुमचे आभार मानावेच लागतील.

गुरूजी : का माझ्या जखमेवर मीठ चोळतोहेस?

विद्यार्थी : तुम्हीच शिकवलंत ना,

गुरूजी : काय?

विद्यार्थी : हल्ला इतका व्यवस्थित चढवायचा की प्रतिपक्षाला बचावाची संधीच मिळू द्यायची नाही.

गुरूजी : म्हणजे?

विद्यार्थी : मघाशी मी तुम्हाला दोन गोष्टी सांगितल्या. एक म्हणजे मला आईची दैनंदिनी सापडली आणि दुसरं म्हणजे आई नाहीशी झाली त्याच्या आदल्या दिवशी तुमच्याकडे आली होती.

गुरूजी : मग?

विद्यार्थी : एकतर ती दैनंदिनी कधीच लिहीत नव्हती आणि दुसरी गोष्ट म्हणजे आपल्यावर बलात्कार झाला हे लिहिण्यासाठी तुम्ही तिला जिवंतच ठेवलेली नव्हती.

गुरूजी : मग...म्हणजे तू...केवळ...हे सगळं...

विद्यार्थी : (हसत) हल्ला इतका व्यवस्थित करायचा की प्रतिपक्षाला बचावाची संधीच मिळू द्यायची नाही. तुम्ही शिकवलेलं पहिलं आणि एकमेव व्यावहारिक सत्य. आयुष्यभर उपयोगी पडणारा हा धडा दिल्याबद्दल आपले मन:पूर्वक आभार. मघाशी मी तुम्हाला म्हटलं होतं की, जाण्यापूर्वी मी तुमची परवानगी घेईन म्हणून. आता निघू मी?

गुरूजी : तू बोलावंस आणि मी विश्वास ठेवावा, अशी परिस्थिती राहिलेली नाही मुला.

विद्यार्थी : तुमच्या मनात काय आहे ते मी ओळखू शकतो गुरूजी. पण ‘एक निष्कलंक चारित्र्याचा, निष्काम कर्मयोगी’ या तुमच्या प्रतिमेला धक्का

लागेल असं काहीही वर्तन करणार नाही मी. आज इथे जे काही घडलं, त्याविषयी एक अवाक्षरही बाहेर काढणार नाही. काढून काय फायदा? तुम्ही आता आपल्या पापाची जी कबुली दिलीत, तीच तुम्हाला झालेली शिक्षा. तुझी केलेली ही भयंकर चूक उरलेल्या आयुष्यात शेवटच्या क्षणापर्यंत तुमचं मन कुरतडत राहील, आणि यापेक्षा अधिक कोणतीही मोठी शिक्षा तुमच्यासाठी असू शकत नाही.

गुरूजी : तू दाखवलेल्या दयेबद्दल तुझे आभार कसे मानावे हेच कळेनासं झालंय मुला. पण मला कृतज्ञता व्यक्त केलीच पाहिजे. मी तुला मघाशी म्हणालो होतो ना की अमेरिकेतील माझा एक विद्यार्थी करंदीकर नुकताच येऊन गेला...

विद्यार्थी : हो. जाताना तुम्हाला एक आश्चर्यकारक वस्तू भेट देऊन गेला होता.

गुरूजी : बरोबर. पण ती भेट खरी तुझ्याच उपयोगाची आहे असं मला वाटतं.

विद्यार्थी : कोणती भेट? (गुरूजी एक पिस्तुल काढून दाखवतात)

विद्यार्थी : हे...हे तर पिस्तुल आहे.

गुरुजी : हो ना. आणि भरलेलं सुद्धा आहे. विशेष म्हणजे याचा वापर करण्याची वेळ इतक्या लवकर आपल्यावर येईल असे मला वाटलं नव्हतं. (रोखतात)

विद्यार्थी : त... तुम्ही हे ...हे काय करताय गुरूजी?

गुरूजी : हल्ला इतका व्यवस्थित करायचा की, प्रतिपक्षाला बचावाची संधीच मिळू द्यायची नाही. मी तुला शिकवलेलं व्यावहारिक सत्य. पहिलं आणि शेवटचंसुद्धा. (पिस्तुल झाडतो. विद्यार्थी वेदनांनी पिळवटत खाली कोसळतो.) शेवटी प्रत्येकाला आपला क्रूस आपणच वाहून न्यायचा असतो. तुझ्या आईला मी इथंच पुरली होती. आता तू ही तिच्या कुशीत चिरविश्रांती घे मुला. किती भाग्यवान आहेस रे तू! (पिस्तूल विद्यार्थ्याच्या अंगावर टाकतात आणि आकाशकडे पाहत हात जोडतात. हळूहळू पडदा.)

*****